"राष्ट्रीय नैसर्गिक शेती अभियान"

# कृषि सखींचे पाच दिवसीय नैसर्गिक शेती प्रशिक्षण संपन्न

कृषी विज्ञान केंद्र, धुळे व आत्मा, धुळे यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय नैसर्गिक शेती अभियानांतर्गत कृषी सखी यांचे दुसऱ्या टप्प्यातील पाच दिवसीय नैसर्गिक शेती प्रशिक्षण कार्यक्रम ९ ते १३ मार्च या दरम्यान कृषी विज्ञान केंद्र, धुळे येथे संपन्न झाले. सदर कार्यक्रमाच्या उद्घाटन प्रसंगी कृषी विज्ञान केंद्राचे वरिष्ठ शास्त्रज्ञ तथा प्रमुख डॉ. दिनेश नांद्रे, कृषिभुषण श्री. दिलीप पाटील, प्रशिक्षण समन्वयक डॉ. अतिश पाटील, डॉ. पंकज पाटील, श्री. रोहित कडू, श्री. जगदिश काथेपुरी, श्रीमती अमृता राऊत, डॉ. धनराज चौधरी तसेच कृषि अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

प्रशिक्षण समन्वयक डॉ. अतिश पाटील यांनी प्रस्तावनेतून पाच दिवसीय नैसर्गिक शेती प्रशिक्षण कार्यक्रमाची रूपरेषा सविस्तरपणे सांगितली. गाव पातळीवर राष्ट्रीय नैसर्गिक शेती अभियान राबवत असताना कृषी सखींचे अनुभव, येणाऱ्या अडचणी, पुढील रूपरेषा व शेतकरी सहभाग वाढविण्यासाठी करावयाचा कृती आराखडा यावर विचार मांडले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. दिनेश नांद्रे यांनी राष्ट्रीय नैसर्गिक शेती अभियान प्रशिक्षणाचा प्रमुख्य उद्देश त्यांच्या भाषणातून मांडला. कृषि सखींच्या माध्यमातून गाव पातळीवर नैसर्गिक शेतीची प्रभावी अंमलबजावणी करणे, शेतकऱ्यांना स्वावलंबी बनवणे, विषमुक्त अन्न निर्मिती, सक्षमीकरण आणि समूह स्तरावर आदर्श नैसर्गिक प्रात्यक्षिक शेतांची उभारणी करणे हे स्पष्ट केले.

नैसर्गिक शेतीचे मुलभूत घटक, जमीन आरोग्य व्यवस्थापन, सेंद्रिय कर्ब, देशी गोवंश, बियाणे, बिज प्रक्रिया, बहुपीक पद्धती, अन्नधान्य, भाजीपाला, फळबाग उत्पादन तंत्रज्ञान, कृषि मलाचे मूल्यवर्धन, जैविक खते, जैविक कीटकनाशके, तसेच नैसर्गिक निविष्ठांचा वापर करून किड– रोग व्यवस्थापन यावर सविस्तरपणे चर्चा झाली. पाच दिवसीय नैसर्गिक शेती प्रशिक्षण कार्यक्रमात डॉ. दिनेश नांद्रे, डॉ. अतिश पाटील, डॉ. पंकज पाटील, डॉ. धनराज चौधरी, श्री. रोहित कडू, श्री. जगदिश काथेपुरी, श्रीमती अमृता राऊत, श्री. जयराम गावीत यांनी विविध विषयांवर तांत्रिक मार्गदर्शन केले. नैसर्गिक शेतीचे स्वानुभव, विक्री व्यवस्थापन, स्थानिक परिस्थितीनुसार पिक पद्धती यावर कृषिभुषण श्री. दिलीप पाटील यांनी मनोगत व्यक्त केले.

**निविष्ठा निर्मिती प्रात्यक्षिकांचे सादरीकरण**

नैसर्गिक पद्धतीने जमिनीचे – पिकांचे संवर्धन करण्यासाठी घनजीवामृत, बिजामृत व जीवामृत निर्मितीचे कृती प्रात्येक्षिक डॉ. अतिश पाटील यांनी दाखवले. किड व रोग नियंत्रणासाठी निमास्त्र, अग्नि अस्त, ब्रह्मास्त्र, दशपर्णी अर्क इत्यादी नैसर्गिक निविष्ठा तयार करण्याचे कृती प्रात्येक्षिक डॉ. पंकज पाटील यांनी उपस्थित प्रशिक्षणार्थींना करून दाखवले. तसेच नैसर्गिक निविष्ठा तयार करताना येणाऱ्या अडचणी, उपाय व वापर यावर प्रात्यक्षिकांसह चर्चा झाली. श्री. जयराम गावीत यांनी कृषि विज्ञान केंद्राच्या नैसर्गिक शेती प्रक्षेत्रावरील विविध पिक संग्रहालयाची माहिती दिली.

प्रशिक्षण कार्यक्रमाचे सुत्रसंचालन डॉ. धनराज चौधरी व आभार सौ. प्राची काळे यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यात सौ. स्वप्नाली कौटे, श्री. स्वप्नील महाजन, बाळू वाघ, रमेश शिंदे, कुमार भोये, मधुसूदन अहिरे, कुणाल राजळे, जीवन राणे, सौ. सुरेखाताई मोरे ई. कृषि विज्ञान केंद्रातील अधिकारी आणि कर्मचारी यांचे बहुमोल योगदान लाभले.



घनजीवामृत, बिजामृत व जीवामृत निर्मितीचे कृती प्रात्येक्षिक दाखवताना डॉ. अतिश पाटील




राष्ट्रीय नैसर्गिक शेती अभियानांतर्गत कृषी सखी यांचे पाच दिवसीय नैसर्गिक शेती प्रशिक्षण कार्यक्रम